# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


प्रेस नोट ३६१-२२ दिनांक- २७/११/२०२२

## न्यायालयीन कोठडीत असतांना न्यायालयाच्या परिसरातुन पळुन जाणा-या व त्यास सहकार्य करणा-या आरोपीत यांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

-------00000-------

दिनांक २९/०७/२०२१ रोजी आय.सी.आय.सी.आय.बॅंक, शाखा-विरार पुर्व, बॅंकेचे लॉकरमधील दागीने जबरीने चोरी करतांना खुन व हत्येचा प्रयत्न करणारा आरोपी नामे - अनिलकुमार राजदेव दुबे, हा विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ६४८/२०२१ भा.दं.वि.कलम-३०२,३०७,३९७ या गुन्हयात मागील दिड वर्षापासुन न्यालयीन कोठडी मध्ये असुन आरोपीत यास नमुद गुन्हयाचे कोर्ट पेशी करता दिनांक २५/११/२०२२ रोजी मध्यवर्ती कारागृह ठाणे येथुन वसई न्यायालयात आणले असता न्यायालयाच्या परिसरातुन पोलीसांची नजर चुकवुन आरोपीत अनिलकुमार राजदेव दुबे हा त्याचे साथीदाराच्या मदतीने पळुन गेल्याने सदर प्रकरणी वसई पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३५९/२२ भा.द. वि. स कलम-१२०(ब) ,२२३,२२४, २२५ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर घटनेची वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभीऱ्याने दखल घेवून पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी सदर फरार झालेला अनिलकुमार राजदेव दुबे व त्यास पळुन जाणे करीता सहकार्य करणारा आरोपीत यांना पकडणे बाबत दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष -३ चे वेगवेगळे पोलीस पथक तयार करुन गुप्त बातमीदार याचे मार्फतीने आरोपीत याची माहीती मिळवुन आरोपीत नामे १) अनिल राजदेव दुबे वय- ३६ वर्षे, जुना कैदी नंबर ४३२२/२०२० नविन कैदी नंबर १४७२/२०२० रा. मध्यवर्ती कारागृह ठाणे, जि. ठाणे. २) चांद बादशहा अजीज खान वय- ४२ वर्ष, रा. रुम नंबर २०३, डांगेप्लाझा बिल्डींग, सोपारा बजार, नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर. यांना दिनांक २७/११/२०२२ रोजी नालासोपारा पूर्व येथुन ताब्यात घेतले. तसेच सदर आरोपीतांनी पळुन जाण्याकरिता वापरण्यात आलेल्या मोटारसायकल सह ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपीत यांचेकडे अधिक तपास करता आरोपीत चांद बादशहा अजीज खान याचेवर यापुर्वी चोरीचे ४ गुन्हे दाखल आहे. उक्त आरोपीत यांना पुढील कारवाई करीता गुन्हे शाखा कक्ष -२ कडे वर्ग करण्यात आले आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पो.उपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ सागर बारवकर, पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा/ शंकर शिंदे, पो.हवा/ मनोज सकपाळ, पो.हवा/ अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, पो.अं./ सुमित जाधव, मसुब/ प्रविन वानखेडे सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

